गोपनीय/नोंदणीकृत डाकेने/ई-मेल द्वारे

**श्री. प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी यांना शासन सेवेत पुन:स्थापित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन आदेश क्रमांक- निलंब-२०२६/प्र.क्र.१३/को.प्र.-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- १६ सप्टेंबर, २०२६.

वाचा:-

१) शासनाचे समक्रमांकाचे दि.२०.०३.२०२६ रोजीचे आदेश.

२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र. निप्रआ ११२२/प्र.क्र.०९/विचौ-२, दि.२२.०४.२०२५.

## आदेश

श्री. प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, बुलढाणा वाचा क्र.१ येथील दि.२०.०३.२०२६ रोजीच्या शासन आदेशान्वये दि.२७.०२.२०२६ रोजी पासून मानीव निलंबित करण्यात आले आहे;

२. वाचा क्र.२ येथील शासन निर्णय, सा.प्र.वि., दि.२२.०४.२०२५ अन्वये निलंबित शासकीय कर्मचा-यांच्या प्रकरणांचा आढावा घेण्याबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परि.१ (अ) ii नुसार श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी यांचेविरूध्द मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला असून श्री.प्रविण मोंढे यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात अभियोग दाखल करण्यास दि.३१.०७.२०२६ रोजीच्या आदेशान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच, त्यांचेविरूध्द दि.१३.०८.२०२६ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. त्यामुळे, श्री. मोंढे यांना शासन सेवेत पुन:स्थापित करणे आवश्यक आहे.

३. त्यानुसार श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी यांचे निलंबन संपुष्टात आणून त्यांना शासन सेवेत पुन:स्थापित करुन त्यांची लेखा अधिकारी (जमा), जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली या अकार्यकारी पदावर पदस्थापना करण्याचा निर्णय शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांनी घेतला आहे.

४. त्यानुसार, श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी यांचे निलंबन त्यांच्याविरुद्धच्या फौजदारी खटल्यातील निर्णयाच्या व विभागीय चौकशीच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सदर आदेशान्वये संपुष्टात आणून त्यांना शासन सेवेत पुनःस्थापित करण्यात येत आहे.

AnyScanner

५. तसेच, श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी त्वरीत रुजू होऊन त्याबाबतचा रुजू अहवाल शासनास सादर करावा, अन्यथा त्यांची ही अनधिकृत गैरहजेरी म्हणून समजण्यात येईल.

हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रुपाली कबरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

श्री.प्रविण गोविंदराव मोंढे, अप्पर कोषागार अधिकारी
(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

प्रत-

(१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर.)
(२) महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र) १ व २ मुंबई/नागपूर. )
(३) अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(४) प्रधान सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(५) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(६) सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर विभाग, नागपूर.*
(७) सहसंचालक, लेखा व कोषागारे, अमरावती विभाग, अमरावती *
(८) कक्ष अधिकारी (कोषा-प्रशा-२) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
(९) निवडनस्ती (कोषा-प्रशा-१)

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत)

AnyScanner